## फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१७/२०२६ मधील निशाणी १ वरील आदेश

१. अर्जदार यांनी हा अर्ज गु.र.नं.७०/२०२६ चे कामी जाबदार अकोले पोलीस स्टेशन, अकोले यांनी जप्त केलेले दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण त्यामध्ये दोन सोन्याच्या वाट्या, चैन व आठ काळे मनी *(यापुढे त्याचा उल्लेख "जप्त सोन्याचे दागिने" असा केला आहे.)* परत मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे अर्जातील कथनांप्रमाणे जप्त सोन्याचे दागिने हे त्यांचे मालकीची असून जाबदार अकोले पोलीस स्टेशन, अकोले यांनी गुन्हा रजि.नं.७०/२०२६ चे कामी ते दागिने जप्त केले आहे. ते दागिने एकाच जागेवर पडून राहिलेस त्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे. अर्जदार हे अटी व शर्तींचे पालन करणेस तयार आहेत. सबब, अर्ज मंजूर करणेत यावा, अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. जाबदार यांनी निशाणी ०६ वर म्हणणे दाखल करुन जप्त सोन्याचे दागिने अर्जदार यांचे ताब्यात देणेस काहीएक हरकत नाही, असे कथन केले आहे.

४. सहाय्यक सरकारी वकील यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. त्यांचे कथनांप्रमाणे अर्जातील मुद्देमाल हा अकोले गुन्हा रजि.नं.७०/२०२६ मधील महत्त्वाचा व वस्तुनिष्ठ पुरावा असून या गुन्हयाचा तपास प्राथमिक स्तरावर आहे. जप्त मुद्देमाल हा या गुन्हयाचे सुनावणी कामी आवश्यक आहे. जप्त मुद्देमालाचे मालकी व ताब्याबाबत शहानिशा होणे आवश्यक व गरजेचे आहे. जप्त मुद्देमाल हा अर्जदाराचे ताब्यात दिल्यास अर्जदार त्यामध्ये फेरबदल अथवा विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी विनंती सहाय्यक सरकारी वकील यांनी केली आहे.

५. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये आणि जाबदार व सहाय्यक सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये केलेली कथने आणि निशाणी ८ वरील प्रथम खबरी अहवाल पाहता वर नमूद सोन्याचे दागिने हे जाबदार अकोले पोलीस स्टेशन यांनी गु.र.नं.७०/२०२६ चे कामी जप्त केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. निशाणी १० वरील आधार कार्डच्या प्रमाणित प्रतीवरुन अर्जदार यांची ओळख स्पष्ट होते. निशाणी ०९ वरील पी.एन.गाडगीळ ॲन्ड सन्स यांनी दिलेल्या पावतीची प्रमाणित प्रत पाहता जप्त सोन्याचे दागिने हे अर्जदार यांचे मालकीचे असल्याचे दिसून येते.

६. सहाय्यक सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये अर्जदार हे जप्त सोन्याचे दागिने विक्री करण्याची शक्यता आहे. तसेच, ते दागिने पुराव्याचेकामी आवश्यक आहे, अशी हरकत घेतली आहे. परंतु, या हरकतीचे स्वरुप पाहता ती हरकत तांत्रिक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. सहाय्यक सरकारी वकील यांनी उपस्थित केलेल्या हरकतीचा विचार करता त्या अनुषंगाने अर्जदार यांना काही अटी व शर्तींचे पालन करणेस बंधनकारक करुन जप्त सोन्याचे दागिने हे अर्जदार यांचे ताब्यात देता येऊ शकते. जप्त सोन्याचे दागिने हे जाबदार यांचे कार्यालयाचे आवारात विनावापर ठेवून दिल्यास ते दागिने खराब अगर गहाळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे झालेस, अर्जदार यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. अर्जदार ह्या मालक या नात्याने जप्त सोन्याचे दागिने याची व्यवस्थित देखभाल करु शकतात. सबब, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ मधील तरतूदींचा विचार करता व **सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द स्टेट ऑफ गुजरात, ए.आय.आर.२००३, सुप्रिम कोर्ट ६३८** या न्यायनिर्णयाचा विचार करता वर नमूद दागिने अर्जदार यांना काही अटी व शर्तींवर परत करणे योग्य व संयुक्तिक होईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे :-

## आ दे श

१. अर्जदार यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. जाबदार अकोले पोलीस स्टेशन, अकोले यांनी अर्जदार यांना गु.र.नं. ७०/२०२६ मधील जप्त मुद्देमाल दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण त्यामध्ये दोन सोन्याच्या वाट्या, चैन व आठ काळे मनी हे खालील अटी व शर्तीवर परत करावे –

अ. अर्जदार यांनी एकूण रक्कम रुपये २,००,०००/– (रुपये दोन लाख मात्र) चे बंधपत्र लिहून द्यावे.

ब. जप्त मुद्देमाल सोन्याचे दागिने यांची विक्री अगर तबदिल करणार नाही, त्यामध्ये फेरबदल करणार नाही, न्यायालयास व पोलिसांना आवश्यकता असेल त्यावेळी तो मुद्देमाल हजर करीन, अशा आशयाचे अर्जदार यांनी हमीपत्र लिहून द्यावे.

क. अर्जदार यांनी जप्त मुद्देमाल सोन्याचे दागिने न्यायालयास व पोलिसांना आवश्यक वाटल्यास हजर करावे.

ड. अर्जदार यांनी जप्त मुद्देमाल सोन्याचे दागिने याचे चार प्रतींमध्ये रंगीत फोटो काढून ते जाबदार अकोले पोलीस स्टेशन यांचेकडे सादर करावेत.

इ. जाबदार अकोले पोलीस स्टेशन यांनी रितसर पंचनामा करुन जप्त सोन्याचे दागिने अर्जदार यांचे ताब्यात देणेचे आहेत.

–

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.24 17:53:26 +0530

**दिनांक : २४.०३.२०२६** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाण : अकोले** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर.**

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original order.

Sd/-
(Amol U. Salpe)
Stenographer (Grade-3)
Jt.Civil Court Junior Division
Akole

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 24.03.2026 |
| Transcribed on | : | 24.03.2026 |
| Checked and signed on | : | 24.03.2026 |